मातृभूमि

# लीलावती हॉस्पिटलचा मोफत रोशनी मोतीबिंदू सेवा हा उपक्रम




लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, मुंबईतील चॅरिटेबल हॉस्पिटलच्या वतीने वंचित व्यक्तींसाठी मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याच्या उद्देशाने रोशनी मोतीबिंदू सेवा हा उपक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन लीलावती हॉस्पिटलचे राजीव मेहता आणि रूग्णालयाचे सीओओ निरज उत्तमानी आणि नेत्ररोग विभागातील डॉक्टरांचे पथकाने केले. या उपक्रमाचा उद्देश डोळ्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवताना गरजूंना १००% अत्याधुनिक नेत्र निगा सेवा प्रदान करणे हा आहे. मुंबईच्या लीलावती हॉस्पिटलमधील संस्थापक आणि विश्वस्त श्रीमती चारू मेहता यांच्या रोशनी मोतीबिंदू सेवा उपक्रमाचा एक भाग म्हणून, गरजू व्यक्तींवर कोणताही आर्थिक भार येऊ न देता अत्यावश्यक नेत्रसेवा सेवा उपलब्ध होतील. एखादी व्यक्ती याकरिता पुर्वनोंदणी करू शकते आणि तज्ज्ञांच्या देखरेखीखाली तपासणी करू शकते. हा उपक्रम केवळ वैद्यकीय मदतच देत नाही तर डोळ्यांचे आरोग्य चांगले राखण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवतो. या कार्यक्रमाद्वारे लीलावती हॉस्पिटलने आर्थिक अडचणींमुळे परवडत नसलेल्यांनाही दर्जेदार आरोग्य सेवा पुरविल्या जातील. रोशनी मोतीबिंदू सेवा उपक्रमाच्या माध्यमातूम गरजू व्यक्तींना आवश्यक नेत्रसेवाचिकित्सा व उपचार उपलब्ध होतील. आर्थिकदृष्ट्या कमकुवत समाजातील गरजू व्यक्तींची मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचा हॉस्पिटलचा मानस आहे. रोशनी मोतीबिंदू सेवेतंर्गत आम्ही सुमारे २०० रूग्णांची तपासणी केली आहे, त्यापैकी २९ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे. लोकांना अंधत्वाचा सामना करावा लागू नये याकरिता लीलावती हॉस्पिटल सदैव प्रयत्नशील राहिल. यापुढेही ५०० हून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा आमचा मानस आहे.

**सुबोध रणशेवरे**

Akola Edition
Apr 23, 2024 Page No. 5
Powered by: erelego.com